**पंतप्रधानांना इथियोपियाचा सर्वोच्च सन्मान प्रदान (डिसेंबर 16, 2025)**

16 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी 16-17 डिसेंबर 2025 या कालावधीत इथिओपियाला पहिली द्विपक्षीय भेट देत आहेत.आज ॲडिस इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित विशेष समारंभात, इथिओपियाचे पंतप्रधान मा. डॉ. अबीय अहमद यांनी भारत–इथिओपिया भागीदारी बळकट करण्यात दिलेल्या असाधारण योगदानाबद्दल तसेच जागतिक राजनेते म्हणून त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाबद्दल, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना इथियोपियाचा सर्वोच्च सन्मान द 'ग्रेट ऑनर निशान ऑफ इथिओपिया' प्रदान करण्यात आला.

2. या प्रसंगी बोलताना, पंतप्रधान मोदी यांनी, इथियोपिया सारख्या जगातील प्राचीन संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राष्ट्राकडून हा सन्मान मिळणे हे आपल्यासाठी अत्यंत गौरवाचे असल्याचे सांगत, तो नम्रता आणि कृतज्ञतेच्या भावनेने स्वीकारल्याचे अधोरेखित केले. पंतप्रधान मोदी यांनी या सन्मानाबद्दल पंतप्रधान डॉ. अबीय अहमद आणि इथियोपियाच्या जनतेप्रती मनःपूर्वक आभार व्यक्त केले. त्यांनी राष्ट्रीय एकता, शाश्वतता आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी पंतप्रधान डॉ. अबीय यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. राष्ट्र निर्मितीमध्ये ज्ञानाच्या महत्त्वावर भर देताना, गेल्या शंभरहून अधिक वर्षांपासून इथिओपियाच्या प्रगती व विकासात योगदान देणे हे भारतीय शिक्षकांसाठी सन्मानाची बाब असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले.

3.पंतप्रधान मोदी यांनी हा सन्मान दीर्घकाळापासून – भारत व इथिओपिया - द्विपक्षीय संबंध वृद्धिंगत करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व भारतीय व इथिओपियन नागरिकांना अर्पण केला आणि हा सन्मान प्रदान करण्यात आल्याबद्दल 1.4 अब्ज भारतीयांच्या वतीने त्यांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. हा सन्मान प्रदान करण्यात आल्यामुळे भारत आणि इथिओपिया यांच्यातील घनिष्ठ भागीदारीत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला असून, जागतिक दक्षिणेच्या सकारात्मक अजेंडाला पुढे नेण्यासाठीही यामुळे बळकटी मिळाली आहे. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल. [लिंक]. [लिंक]

ॲडिस अबाबा

16 डिसेंबर 2025